शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

विशेष कक्ष

परिपत्रक क्र. 34/२०२३

विषय : **सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांमधील शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल या संवर्गातील शिक्षकीय पदांच्या प्राथमिक बिंदूनामावली तपासणी करून घेणेबाबत मुदतवाढीबाबत.**

संदर्भ :

१. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६—ब(ए), दि.०६/०७/२०२१.

२. शासन निर्णय क्रमांक : आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/म.शि.५,दि.१२/११/२०२१.

३. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८ए/१८/१६-ब,दि.२५/०२/२०२२.

४. महाराष्ट्र शासन अधिसूचना : दि.०७/०४/२०२२

५. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दि.११/०४/२०२२

६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग — शासन निर्णय क्रमांक : १५१३/प्र.क्र.१२५(भाग—८) म.शि.५, दि. २५ मार्च, २०२३

७. उच्च व तंत्र शिक्षण विभाग — शासन शुध्दीपत्रक क्रमांक : आढावा—१५१३/प्र.क्र. १२५(भाग—८)म.शि.५, दि. २७ मार्च,२०२३

८. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ३२/२०२३, जा. क्र. विशेष कक्ष/शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल बिंदूनामावली शिबीर/२०२३/३४०, दि. ०८ सप्टेंबर, २०२३.

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून संदर्भ क्र. ०८ नुसार शैक्षणिक संस्था/अनुदानित महाविद्यालयाने आपल्या स्थरावर ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पद भरतीकरिता प्राथमिक बिदूंनामावली तपासणी/रिक्त पदाबाबतचे पत्र विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयाकडून प्राप्त करून त्याची एक प्रत विशेष कक्ष विभागाकडे दि. २२ सप्टेंबर, २०२३ अखेर जमा करावी. महाविद्यालयाकडून प्राप्त होणारे पत्र एकत्रिकरण करून प्राथमिक बिंदूनामावली तपासणी शिबीराचे आयोजन विशेष कक्ष विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे. प्राथमिक बिंदूनामावली तपासणी शिबीराबाबतचे (वेळापत्रक/Time Table) परिपत्रक स्वंतत्ररित्या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. असे कळविण्यात आले होते.

तथापि, काही शैक्षणिक संस्था व अनुदानित महाविद्यालये यांचेकडून अद्यापही प्राथमिक बिंदूनामावली तपासणी करिता विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र विशेष कक्ष विभागाकडे जमा केलेले नाही.

**तेव्हा, उपरोक्त बाब विचारार्थ घेवून विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून प्राप्त होणारे पत्र विशेष कक्ष विभागाकडे दि. २५ सप्टेंबर, २०२३ ते दि. ०५ ऑक्टोंबर, २०२३ अखेर जमा करण्याकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. मुदतीत प्राप्त होणारे प्रस्ताव एकत्रिकरण करून बिंदूनामावली तपासणी शिबीर आयोजित करण्यात येईल.त्याचे वेळापत्रक स्वंतत्ररित्या कळविण्यात येईल.**

**जा.क्र. विशेष कक्ष/शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल बिंदुनामावली शिबीर/२०२३/** 360

**दिनांक:** 26 SEP 2023

RSPandit

**उपकुलसचिव,**
**तथा प्राथमिक बिंदुनामावली तपासणी अधिकारी**
**विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—**

**अ.** मा. प्राचार्य, शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालये/शैक्षणीक संस्था.

**ब.** वेब मास्टर, शिवाजी विद्यापीठ विशेष कक्ष लिंकवर प्रसारित करणेसाठी

**क.** कार्यालयीन संचिका